krishi arakhada letter

महाराष्ट्र शासन
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सातारा,यांचे कार्यालय

फोन. नं.०२१६२२२१९०७ email ID- ddcahsatara@gmail.com

## -- बातमी --

## " पशुसंवर्धन विभागाच्या शेळी/मेंढी व 1000 मांसल कुक्कुट पक्षी गट वाटप या योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा "

1. **शेळी/मेंढी पालनाद्वारे पुरक उत्पन्न मिळवुन देणे करीता शासनाने राज्यस्तरीय नाविन्यपुर्ण योजना** सन 2017-18 अंतर्गत अंशतः ठाणबंद पध्दतीने संगोपन करण्यासाठी 10 शेळया/मेंढया + 1 बोकड/ नर मेंढा गट वाटप योजना सुरु केलेली आहे.

अशा एका गटासाठी रुपये 87857/- ऐवढा प्रकल्प खर्च अपेक्षीत आहे. (या मध्ये शेळया/मेंढया खरेदी, बोकड/नर मेंढा खरेदी, विमा, शेळयांचा वाडा, खाद्याची व पाण्याची भांडी, आरोग्य सुविधा व औषधोपचार इत्यादी बाबींचा समावेश आहे.) जिल्हास्तरीय निवड समितीने निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील लाभार्थीना 50 टक्के अनुदान म्हणजेच र 43,929/- (उस्मानाबादी/संगमनेरी जातीसाठी) अनुज्ञेय राहील. अनुसुचित जाती/ जमाती प्रवर्गातील लाभार्थीसाठी 75 टक्के अनुदान म्हणजेच र 65,893/- (उस्मानाबादी/संगमनेरी जातीसाठी) अनुदान अनुज्ञेय राहील.

2. **पशुसंवर्धन विभागाच्या राज्यामध्ये 1000 मांसल कुक्कुट पक्षी संगोपानाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय सुरु करणे - या योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा .**

या योजने अंतर्गत पक्षी संगोनासाठी पक्षीगृह व इतर मुलभूत सुविधा उभारणेकरीता सर्वसाधारण योजनेतून खुल्या प्रवर्गातील लाभार्थीना प्रति युनिट रुपये 2,25,000/- प्रकल्प खर्चाच्या 50% म्हणजेच रु. 1,12,500/- या मर्यादेत व अनुसुचित जाती उपयोजना (विघयो) व अदिवासी उपयोजनेतून अनुक्रमे अनुसुचित जाती / जमातीच्या लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या 75% म्हणजेच रु. 1,68,750/- मर्यादेपर्यंत शासकिय अनुदान देय राहिल प्रकल्पासाठी शासकीय अनुदाना व्यतिरिक्त खुल्या प्रवर्गातील लाभार्थीनी उर्वरित 50% रक्कम म्हणजेच रु. 1,12,500/- व अनुसुचित जाती / जमातीच्या लाभार्थ्यांना 25% रक्कम म्हणजेच रु. 56,250/- स्वतः अथवा बँक / वित्तीय संस्थेकडून कर्ज घेवून उभावयाचे आहे. बँकेकडून कर्ज घेणाऱ्या खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यासाठी किमान 10% स्वहिस्सा व उर्वरित 40% बँकचे कर्ज त्याचप्रमाणे अनुसुचित जाती जमातीच्या लाभार्थ्यासाठी किमान 5% स्वहिस्सा व उर्वरित 20% बँकेचे कर्ज या प्रमाणे रक्कम लाभार्थ्यांने उभारावयाची आहे.

या व्यतिरिक्त लाभार्थी करीता 1000 पक्षांच्या संगोपना करिता येणारा अंदाजीत आवर्ती खर्च ज्यामध्ये एक दिवशीय पिल्लांची किंमत पक्षी, खाद्य, लस, औषधे, तुस, विद्युत व पाणी इत्यादी बाबीवर होणारा खर्च हा लाभार्थ्याने स्वतः करावयाचा आहे. किंवा लाभार्थीस खाजगी कंपनीसोबत करार करण्याची मूभा राहिल.

अनुदान व्यतिरिक्त उर्वरित रक्कम लाभार्थीनी स्वतः / बँकेकडून कर्ज घेवून उभारावयाची आहे. बँक /बँकेकडून कर्ज घेणाऱ्या लाभार्थीना प्राधान्य देण्यात येईल. तसेच या योजनेकरीता दारिद्रय रेषेखालील लाभार्थी, अत्यल्प भूधारक, अल्प भूधारक, सुशिक्षीत बेरोजगार, महिला बचत गटातील लाभार्थी यांची प्राधान्यक्रमानुसार निवड करणेत येईल.

या योजनेकरीता करावयाचे अर्जाचे नमुने नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात अगर तालुक्याच्या पंचायत समिती येथे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे स्तरावर उपलब्ध असून लाभार्थींनी अर्ज पुर्णपणे भरुन अनुषंगीक कागदपत्रासह पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेकडे (पोहच घेवून) दि. 9/8/2017 अखेर कार्यालयीन वेळत सादर करणेबाबत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. विनोद पवार यांनी आवाहन केले आहे.